Vol 5 Issue 5 Feb 2016

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra
Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University,
Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science &
Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University,
Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and
Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance
Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College
Commerce and Arts Post Graduate Centre
(BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate
College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

# Review of Research
International Online Multidisciplinary Journal

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 5 | Feb - 2016




# शेतकऱ्यांचे उद्धारकर्ते सयाजीराव गायकवाड


राजेंद्र सर्जेराव मगर



**सारांश**

दुष्काळ, नापिकी व निसर्गाचा लहरीपणा यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. शेतकरी कंगाल झाला आहे. सरकारी हात जरी शेतकऱ्यांबरोबर असला तरी ती मदत तुटपुंजी आहे. यामुळे शेतकऱ्यांबरोबर ग्रामीण अर्थव्यवस्था खिळखिळी बनत चालली आहे. या पार्श्वभूमीवर पूर्वीच्या राजांनी शेतकऱ्यांना कशा प्रकारे मदत केली. हे पाहणेही महत्त्वाचे ठरते. शेतकऱ्यांना आपल्या राज्यकारभाराचा कणा समजणाऱ्या राजांपैकी बडोद्याचे सयाजीराव गायकवाड हे एक होते. त्यांनी शेतीच्या उत्पन्नाबरोबर शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदत केली. शेतकरी स्वावलंबी बनण्यासाठी मदत केली. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी झटणारा जगावेगळा हा राजा होता.


## 1) प्रास्ताविक



सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांना बडोद्याचे राजे खंडेराव महाराजांच्या पत्नी जमनाबाई गायकवाड यांनी दत्तक घेतले होते. त्यांनी राज्यकारभार हाती येताच अनेक क्षेत्रात सुधारणा केल्या. शिक्षणाशिवाय प्रगती नाही हे महाराज जाणून होते. म्हणून त्यांनी आपल्या संस्थानात गावोगावी शाळा सुरू केल्या. सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण सुरू केले. सामाजिक, राजकीय सुधारणाही केल्या. स्त्रीयांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. समाजातील सर्व स्तरातील लोकांच्या उन्नतीसाठी आयुष्यभर झटत राहिले. सामाजिक सुधारणा लोकमत अजमवत केल्या. काही सुधारणा कायदे करून केल्या. ब्रिटिशांच्या सत्तेचा काटेरी मुकूट डोक्यावर असताना देखील त्यांनी क्रांतीकारकांना मदत केली. देशाच्या स्वातंत्र्याचे, अखंडतेचे स्वप्न ते पाहत होते. वेगवेगळया क्षेत्रातील ज्ञान जनतेला मिळावे, यासाठी त्यांनी शिष्यवृत्ती देऊन अनेकांना परदेशी शिक्षणासाठी पाठविले. परदेश प्रवास करताना जे जे चांगले दिसले ते ते आपल्या राज्यात आणण्याचा प्रयत्न केला, किंवा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. महाराजांनी मराठी, हिंदी व गुजराती साहित्य निर्मितीसाठी प्रयत्न केले. विविध विषयांचे ज्ञान जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी गावोगावी वाचनालये स्थापन केली. फिरते श्रीसयाजीवैभव वाचनालय सुरू केले. शेतकरी सुखी तर तर जग सुखी अशी महाराजांची धारणा होती. त्यासाठी त्यांनी विविध योजना राबविल्या. ते शेतकऱ्यांचे तारणहार होते.

## 2) सयाजीराव गायकवाडांचा अल्प परिचय

सयाजीराव गायकवाडांचा जन्म ११ मार्च १८६३ साली नाशिक जिल्ह्यातील कवळाणे गावी झाला. राज्यभिषेकापूर्वी त्यांचे नाव गोपाळ होते. काशीराव व उमाबाई यांचे ते अपत्य होते. त्यांचे घराणे बडोद्याच्या राजघराण्याशी संबंधीत होते. बडोद्यातील राजे खंडेराव गायकवाडांना अपत्य नसल्याने व ते मरण पावल्याने त्यांच्या महाराणी जमनाबाई गायकवाड यांना दत्तकपुत्र घेण्यास

इंग्रजांनी परवानगी दिली होती. आणि जमणाबाईंनी सयाजीराव गायकवाड (गोपाळ) यांना दत्तक घेतले. ते प्रथम अशिक्षित होते. वयाच्या बाराव्या वर्षापासून अठराव्या वर्षापर्यंत त्यांना नियोजनबद्ध शिक्षण देण्यात आले. राज्यकारभार हाती येताच त्यांनी सुधारणेला सुरुवात केली. अवांतर खर्चात काटकसर केली. जनतेस सुखी करण्याचा प्रयत्न केला. सर्वच क्षेत्रात त्यांनी सुधारणवादी दृष्टीकोन ठेवला. त्यांची विविध विषयावरील भाषणातून याची साक्ष पटते. २७ ऑगस्ट १९३३ रोजी शिकागो येथे भरलेल्या दुसऱ्या जागतिक धर्मपरीषदेचे महाराज अध्यक्ष होते. यावरून त्यांच्या विद्ववत्तेची उंची समजते. जगाची भ्रमंती केलेल्या महाराजांनी आपल्या प्रवासाचा उपयोग संस्थानातील सुधारणांसाठी केला. महाराजांनी अनेक प्रज्ञावंतांना आपल्या संस्थानात आसरा दिला. सर्वच क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती शोधल्या. नवनवीन शेतीची माहिती मिळविण्यासाठी त्यांनी त्या त्या क्षेत्राशी संबंधीत व्यक्तींना शिष्यवृत्ती देवून परदेशात पाठविले. महाराज शेतकऱ्याचा मुलगा असल्याने त्यांना शेतकऱ्यांविषयी अधिकची आस्था होती. म्हणून त्यांनी शेतीत अधिक सुधारणा केल्या.

### *3) शेतसारा पद्धतीत बदल*

महाराजांनी राज्यकारभार हाती घेताच शेतसारा ठरवण्याची पद्धत महाराजांनी पूर्णपणे बदलली. शेतकऱ्यांकडून शेतसारा वसुलीची पद्धत सुद्धा पूर्णपणे बदलली. महाराजांच्या अगोदरच्या कालखंडात शेतात किती बैलाचा नांगर चालतो. किंवा पिकांची राखण करण्याकरिता किती माचवे उभे केले यावर आधारीत शेतसारा वसूल केला जात असे. तसेच शेतसारा वसुलीचे अधिकार स्थानिक श्रीमंत लोकांना होते ते पूर्णपणे काढून घेण्यात आले. ती पूर्वीची अन्यायकारक शेतसारा पद्धत कायमची बंद केली. व नवीन शेतसारा ठरवण्यासाठी व वसूल करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींना अभ्यासाठी नेमले. व त्यानुसार शेतसारा ठरविला. "एका शेताची लागत ठरविताना आदल्याच वर्षी त्या शेतात किती उत्पन्न आले होते. ते प्रथम पाहावयाचे. नंतर गेल्या कित्येक वर्षात किती उत्पन्न आले ते पाहावयाचे. नंतर पुढे अंदाजी किती उत्पन्न येईल हे ठरवायचे. जमीनीच्या लागतीत, जमीनीच्या दरात वाढ झाल्याखेरीज, वाढ करावयाची नाही, हे लक्षात ठेवून लागत ठरवायची. जमीनीच्या उत्पन्नांतून शेतकऱ्याची मजूरी, औत वगैरे जिनसांबद्दल होणारा खर्च किंवा त्यापीत्यर्थ वाया जाणारे व्याज, वगैरे वजा करून नंतर जे उत्पन्न बाकी राहील त्यापैकी निम्म्यापेक्षा अधिक रक्कम लागतीदाखल मुळीच घ्यायची नाही."[१] शेतसाऱ्यामध्ये अशा प्रकारे बदल केला व अन्यायी शेतसारा पद्धत पूर्णपणे बदलली. बडोदा राज्यात देवस्थान, पीरस्थान व धार्मीक स्थानांसाठी अगोदरच्या राजांनी मोफत जमिनी दिल्या होत्या. त्या जमीनींचे मोजमाप नव्हते. देवस्थानची व्यवस्था पाहणाऱ्या व्यक्तींच त्या जमीनी कसत. त्या बदल्यात सरकारी तिजोरीत कसल्याही प्रकारचा शेतसारा भरत नसत. पण महाराजांनी अशा बारखळी (खळया बाहेरची) जमीनीची मोजणी करून घेतली. त्यांनाही शेतसारा लागू केला. राज्याचे उत्पन्न वाढविले.

जमीनीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण होत असताना वाढलेल्या माणसांमुळे लहान लहान तुकडे होत होते. यासाठी महाराजांनी जमीनीचे तुकडे न पाडण्याचा कायदा केला. जमीन सलग होण्यासाठी जमीन एकत्रीकरणाचा कायदा केला. शेतात जनावरे मोकाट सोडणाऱ्यांना शिक्षा करणारा कायदा केला. उपयोगी जनावरांची धार्मिक कारणास्तव होणारी हत्या कायद्याने बंद केली. अशा प्रकारे महाराजांनी शेतीत मूलभूत पण अमूलाग्र बदल करत शेतकऱ्याचे पर्यायाने राज्याचे उत्पन्न वाढविले. सर्व शेतकऱ्यांना समान करपद्धती लागू केली.

### *4) शेतकऱ्यांना मदत*

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले तरच राज्याचे उत्पन्न वाढणार आहे. हे सयाजीराव जाणून होते. म्हणून उत्पन्न वाढिसाठी शेतकऱ्यांना आर्थिक बार्बीबरोबर इतर बाबतीतही मदत केली. इ.स. १९०६ साली आपल्या राज्यात स्वतंत्र शेती खाते निर्माण केले. शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी महत्त्वाचे आहे. म्हणून त्यांनी शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून दिले. त्यासाठी विहीरी खोदल्या. विहीरी खोदण्यासाठी आर्थिक मदत केली. नदीचे पाणी अडवून शेतकऱ्यांना दिले. "इ.स. १९०० मध्ये हाती घेण्यात आलेले एक मोठे दुष्काळनिवारक कार्य म्हणजे ओरसंग नदीवर जोजवाजवळ केलेले धरणाचे व कालव्याचे बांधकाम हे होय. या धरणाच्या द्वारे १४००० एकर जमीनीला पाणीपुरवठा होणार होता."[२] विहीरी व धरणामधून शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून दिले. पाण्यानंतर शेतकऱ्यांना आर्थिक बाबतीतही स्वावलंबी केले. म्हणून महाराजांनी सहकारी पतपेढया काढल्या. "शेतकऱ्यांच्या वाढत्या कर्जाचा बोजा हा त्यांना निःसत्व करून टाकून सावकारांच्या कचाटीत नेऊन सोडीत होता. त्याबद्दलचा काही तरी इलाज केल्याशिवाय शेतकऱ्यांची धडगत नाही ही गोष्ट महाराजांच्या नजरेत आल्यावाचून राहिली नाही. म्हणून शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीच्या उत्पन्नावर कर्ज देणाऱ्या शेतकी पेढयांची स्थापना कायद्याने करण्यात आली."[३] शेतकऱ्यांना कमी व्याजदरात कर्जपुरवठा सुरू केला. फक्त सहकारी पतपेढयामधून नव्हे तर विविध बॅकामधूनही कर्जपुरवठा सुरू केला. "नवसारी प्रांतातील सोनगड- ब्यारा येथे ॲग्रिकल्चर बॅंकेची स्थापना इ.स. १९०५ च्या सुमारास करण्यात आली. या बॅंकेमार्फत शेतकरी लोकांस सवलतीने कर्ज देऊन सर्व प्रकारची मदत देण्यास सुरुवात केली. त्याचा त्या भागातील शेतकऱ्यांना चांगला उपयोग झाला. त्यानंतर ही योजना संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली. या बॅंकेने हरिजन व आदिवासी शेतकऱ्यांना अधिक सवलती दिल्या होत्या, कारण महाराजांचीच तशी सूचना होती. "[४] कर्जपुरवठयाबरोबरच महाराजांनी नवनवीन बी बियाने उपलब्ध करून दिले. शेतकऱ्यांची जागृती होण्यासाठी त्यांना मार्गदर्शनाची सोय उपलब्ध करून देण्यात आली. "शेतकऱ्यांना बीबियाने पुरविणे, व शेतकीत कशा सुधारणा कराव्या हे प्रयोग, प्रदर्शने, भाषणे इत्यादी रूपाने शेतकऱ्यांना समजावून देणे वगैरे उद्योग त्या खात्याने हाती घेतले. उत्तम नमुनेदार शेते कशी करावी यासाठी सरकारने जगुदन, नवसारी व बडोदे या ठिकाणी नमुनेदार शेती करून एका तालुक्यात जे धान्य होत नाही. त्याची दुसऱ्या तालुक्यात कशाप्रकारे निपज करता येईल, हे सहप्रयोग दाखविण्याची व्यवस्था केली."[५] शेतकरी स्वावलंबी व्हावा हेच महाराजांचे ध्येय होते. त्या ध्येयापर्यंत

पोहचण्यासाठी उपाययोजना केल्या होत्या.

### 5) दुष्काळनिवारण

महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्यानंतर शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वेगवेगळया उपाययोजना केल्या होत्या. पण इ.स. १६०० साली बडोदे संस्थानात मोठा दुष्काळ पडला. त्याची झळ प्रजेला बसू नये म्हणून त्यांनी अनेक उपाययोजना केल्या. त्याचा आढावा स्वतः संस्थानात विविध ठिकाणी भेटी देऊन घेत होते. दुष्काळ निवारणासाठी त्यांनी तीन प्रकारच्या उपाययोजना केल्या. "१) तात्कालीक मदत. त्यामध्ये नागरीकांचे प्राण वाचवण्याला प्राधान्य, त्यासाठी कंगालखाने उघडणे, निर्वाहापुरते धान्य देणे, आगाऊ पैसे देणे. या कामांना प्राधान्य दिले."[६] महाराजांनी प्रजेच्या प्राण महत्त्वाचे मानले होते. या महाराजांच्या प्रयत्नाला चांगले यश आले होते. "२) आपत्ती निवारणात अप्रत्यक्षरीत्या फलदायी होणारी कामे. यामध्ये रेल्वे व रस्त्यांचे नवीन दळणवळणाचे मार्ग तयार करणे. दैनंदिन दळणवळणाच्या सोईप्रमाणेच आपत्कालीन परिस्थितीत एका प्रांतातले शिलकी धान्य दुसऱ्या प्रांतात नेण्यासाठी भविष्यात या मार्ग तयार करणे या कामांचा समावेश केला."[७] यापाठीमागे महाराजांची दूरदृष्टी होती. भविष्यात अशीच परिस्थिती निर्माण झाली तर आपण संकटांना सामना करण्यासाठी तयार असावे. पुन्हा त्याच संकटात आपली हार होऊ नये, असे महाराजांना वाटत असावे. "३) शाश्वत विकासाची कामे यामध्ये पाटबंधाऱ्याची कामे, कालवे काढणे, सरकारची मदत आणि शेतकऱ्यांचे स्वावलंबन या दोन्हींचा समन्वय साधून ही कामे केली जात. व्यापार उद्योगधंदे वाढविणे व नवीन उपक्रमांना उत्तेजन देऊन दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्था गतिशील ठेवण्याची भूमिका होती."[८] महाराजांनी दुष्काळाचा सामना करण्यासाठी अशा स्वरूपाच्या योजना आखल्या. जीवाचे रान केले. दुष्काळी भागातील प्रत्येक निराधार व्यक्तीला तीस रूपयापर्यतची मदत दिली. महाराजांनी आपला खाजगी निधी दुष्काळ निवारणाकडे वळविला. लोकांसाठी अन्नछत्रे उघडली होती. जनावरासाठी चारा पुरविला होता. ज्या भागात दुष्काळाच्या झळा जास्त होत्या त्या भागात विहिरींची कामे सुरू केली. गावातील ओढयांना, नाल्यांना बांध घातले. पाणी आडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबविली होती. "सरकारी तिजोरीतले सत्तेचाळीस लक्ष रुपये दुष्काळी कामासाठी खर्च केले. यात स्वतःचे खानगी खात्यातील साडेतीन लक्ष रुपयेही त्यांनी दिले. सारा माफी केली."[९] महाराजांनी दुष्काळीसाठी सरकारी खजिना रिता केला अनेक उपाययोजना केल्या. दुष्काळासाठी तयार केलेला फॅमीन कोड नुसार कार्यवाही केली. गरीब लोकांना, शेतकऱ्यांना मोठा आधार दिला. महाराजांनी या संकटावर श्रम, पैसा, लोकांचे पाठबळ वापरत मात केली.

### 6) शेतीतील आधुनिकता

बडोदा संस्थानात शेती पारंपारिक पद्धतीने केली जात होती. महाराजांना ती पद्धत पूर्णपणे बदलावयाची होती. आधुनिक शेतीविषयक महाराजांची दृष्टी स्पष्ट होती. परदेशातील शेतीचे ज्ञान आपल्या देशात यावे असे त्यांना वाटत होते. शेतीविषयक ज्ञानप्राप्तीसाठी शिष्यवृत्ती देऊन खासेराव जाधवांना परदेशात पाठविले. "खासेराव जाधवांसारखा जवळचा विश्वासू व्यक्तीच कृषिखात्याची पदवी घेणं गरजेचं होतं. त्यामुळे खासेरावांनी ऑक्सफर्ड विद्यापीठातअंतर्गत कृषी विषयाचे शिक्षण घेण्यासाठी पाठविले."[१०] त्यानुसार शिक्षण घेऊन खासेराव जाधव बडोदा संस्थानात परत आले. बडोदे संस्थानात आधुनिक शेतीचे प्रयोग केले. आधुनिक शेती कशी करावी हे दाखविले. विविध भागात कृषी प्रदर्शने भरविली. त्या प्रदर्शनांना महाराजांनी मुक्तपणे आर्थिक मदत केली. त्या प्रदर्शनांमधून महाराजांनी शेतीविषयक, शेतीपूरक उद्योगधंदे याविषयी अभ्यासपूर्ण विचार मांडले.

महाराजांना आपले संस्थान प्रत्येक क्षेत्रात अग्रभागी असावे असे वाटत होते. शेतीबाबतीतही महाराजांची असाच आग्रह होता. "इ.स. १६०५ साली काश्मीरातील रेशीमाच्या पैदासीच्या पद्धतीचे शिक्षण घेण्यासाठी राजीवभाई पटेल यांना पाठविले होते. बंगालच्या शेतीखात्याचे असिस्टंट डायरेक्टर व सिल्क एक्सपर्ट मि. एन. जी. मुखर्जी यांना बडोद्यात काही महिन्यापुरते बोलावून नवसारी व बडोदे येथे रेशीमाची खास उत्तम रीतीने पैदास कशी करता येईल. याबद्दल विचारविनिमय केला."[११] महाराजांनी शेतीत आधुनिकता आणली. महाराजांना शेतीची पारंपारिक पद्धत मोडीत काढावयाची होती. शेतीत मशागतीची साधने वापण्यास शेतकऱ्यांना त्यांनी प्रोत्साहन दिले. लोखंडी नांगर व इतर आधुनिक साधने शेतकऱ्यांना पुरविली. परदेशातील प्रवास करताना शेतात टॅक्ट्ररचा वापर केलेला त्यांनी पाहिला होता. तसाच वापर आपल्या इकडेही व्हावा असे महाराजांचे धोरण होते. त्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांना मदत केली. त्यामुळे शेतकरी ऑईल इंजीन टॅक्ट्रर शेतात वापरू लागले.

महाराज तरूण असताना महात्मा जोतीराव फुले महाराजांची भेट घेण्यासाठी बडोद्यात गेले होते. त्यांनी शेतकऱ्यांचा असूड हा ग्रंथ वाचून दाखविला होता. जोतीराव फुलेंनी शेती व शेतीविषयी उपदेश केला होता. "भारतासारख्या कृषीप्रधान देशातील शेतकरी शिक्षित झाल्याखेरीज शेतकऱ्यांची उन्नती होणार नाही. म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांना आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यावे व त्यासाठी देशी भाषेत पुस्तके छापावीत. त्यामुळे शेतीचे ज्ञान सहजपणे मिळू शकेल. शेतकऱ्यांच्या मुलांना तर शेतीचे शिक्षण सक्तीचेच करावे. शेतीच्या शिक्षणाबरोबर इतर जोडधंदे यांचे शिक्षण देणे आवश्यक आहे. अशा रितीने तयार झालेली शेतकऱ्यांची मुलेच शिक्षक म्हणून नेमावीत. शेतकरी शहाणा व्हावा म्हणून शेतीचे उपयुक्त ज्ञान प्रयोगशाळेच्या चार भिंतीआड न ठेवता ते शेतकऱ्यांच्या दारात नेण्यासाठी पिकांची व जनावरांची प्रदर्शने भरवावीत"[१२] महाराजांनी हा उपदेश आयुष्यभर पाळला. त्यानुसार संस्थानातील शेतीत आधुनिकता आणली. कलाभुवन या अभिनव शाळेत त्यांनी शेतीला पूरक असे अभ्यासक्रम सुरू केले. त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यत पोहचविण्याचे काम शेतकी अभ्यासक्रमामार्फत केले.

### 7) शेतीपूरक उद्योग

शेतकऱ्यांनी फक्त शेतीवर अवलंबून न राहता शेतीला जोडधंदा म्हणून छोटे मोठे उद्योगधंदे करावेत अशी महाराजांची धारणा होती. शेती करताना उपयोगी प्राणी पाळणे. उदा. गायी, म्हशी, शेळया यांचे पालन करावे यालाही महाराजांनी प्राधान्य दिले होते. जनावराांठी महाराजांनी पशुवैद्यकीय दवाखाने काढले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना पशुधन पाळणे आणि त्यांच्या रोगावर उपाय करणे सोपे झाले.

शेतीवर अवलंबून असणाऱ्या उद्योगाला महाराजांनी प्रोत्साहन दिले. छोटे छोटे उद्योग जे शेतकऱ्यांना घर बसल्या करता येतील किंवा महिलांना करता येतील तसेच त्यातून आर्थिक लाभही मिळेल असे उद्योग महाराजांनी सुरू केले. त्यातून आर्थिक लाभही मिळेल, असा महाराजांचा विचार होता. त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान महाराजांनी परदेशातून आणले. शेतकरी स्वावलंबी व्हावा अशी महाराजांची इच्छा होती. शेतीपूरक उद्योगधंदे असल्याशिवाय शेतकऱ्याच्या कच्चा मालावर प्रक्रिया करता येणार नाही. हे महाराज जाणून होते. म्हणून त्यांनी शेतीपूरक उद्योगाला प्राधान्य दिले. व शेतकऱ्यांना उद्योग काढण्यासाठी आर्थिक मदत केली. "राज्यात उद्योगधंदे असल्याशिवाय शेतकऱ्यांची प्रगती होणे कठीण आहे, हे जाणून या उपक्रमाकडे महाराजांनी या नंतर आपली दृष्टी वळविली. प्रथम सन १८८१ सानी बडोदे येथे सुताची एक गिरणी स्थापन करण्यात आली. सन १८८१ साली तीन लक्ष रूपये भांडवलाचा साखरेचा कारखाना गणदेवी येथे काढण्यात आला होता"[१३] महाराजांनी शेतीवर आधारीत उद्योगाला चालना दिली. सरकारी तिजोरीतून त्यासाठी पैसे वापरले. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी त्यांनी मदत केली.

## 8) समारोप

महाराजांच्या पूर्वी शेतीसारा वसुलीची पद्धत अन्यायकारक होती. ती अन्यायी पद्धत महाराजांनी पूर्णपणे बदलली. शेतकऱ्याला परवडेल व जाचक वाटणार नाही अशी पद्धत त्यांनी निर्माण केली. शेतकऱ्यांना फक्त मदत करून परावलंबी केले नाही. तर स्वकर्तुत्त्वाने स्वावलंबी बनवण्यासाठी महाराजांनी मदत केली. आधुनिक शेतीसाठी लागणाऱ्या उपाययोजना केल्या. त्यासाठी त्यांनी शेतकी शिक्षणच्या शाळा काढल्या. त्यामधून शिक्षण दिले. आधुनिक पद्धती वापरल्यामुळे शेतकऱ्यांचे कष्ट कमी होऊन उत्पादन वाढले.

शेतकऱ्यांची दुरावस्था ही दुष्काळात होते. महाराजांनी यावार मात करण्यासाठी उपाययोजना केल्या. त्यामध्ये तात्पुरत्या उपाययोजनेबरोबर दीर्घकालीन उपाययोजना केल्या. दुष्काळाची पुनरावृत्ती झाली तर झळ पहिल्या दुष्काळाएवढी बसू नये यासाठी सुद्धा महाराजांनी तयारी केली होती. सयाजीराव गायकवाडांनी शेतकऱ्यांना मदत केली. स्वावलंबी केली. उद्योगशील बनविले होते. आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी प्रोत्साहन दिले. म्हणून महाराज शेतकऱ्यांचे तारणहार होते. उद्धारकर्ते होते.

## संदर्भ


१) दांडेकर वि.पां., श्रीमंत सयाजीराव महाराज, ग. ल. ठोकळ प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९३३, पृ. ८४.

२) चावडा व्ही.के., सयाजीराव गायकवाड, (भाषांतर स.गं. मालशे) नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली, पुनर्मुद्रण २१०३,(प्र.आ.१९८७), पृ. ३७.

३) आपटे दा.ना., श्री महाराज सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र खंड-३, प्रकाशक लेखक खुद, प्र.आ. १९३६ पृ. ९३४.

४) पवार निंबाजीराव, जेव्हा गुराखी राजा होतो, राजहंस प्रकाशन, पुणे, स.आ. २०११ (प्र.आ.१९८९) पृ.५९

५) दाते य.रा. श्रीमंत सयाजीराव महाराज यांचे चरित्र, समाविष्ठ 'श्रीसयाजीगौरवग्रंथ', माने पाटील रा.शा. (संपादक), वाढदिवस मंडळ, बडोदे, प्र.आ. १९३३ पृ. ६७.

६) वरखेडे रमेश, प्रस्तावना. सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड-४, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २०१४, पृ. १३.

७) वरखेडे रमेश, उनि, पृ. १३.

८) तत्रैव, पृ.१३

९) भांड बाबा, लोकपाळ राजा सयाजीराव, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २०१३, पृ.१०८.

१०) भांड बाबा, क्रांतिकारक खासेराव जाधव, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २०१५, पृ.१४.

११) य.रा. दाते, उनि, पृ. ६७.

१२ पवार निंबाजीराव, उनि, पृ. ५३.

१३ आपटे दा.ना.,खंड-१,उनि, पृ. ३५०

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org